दि. 22/03/2023

लोकसत्ता पृ. पान क्र.5

# मीरा रोडमध्ये पोलीस आयुक्तालय

## कार्यालयासाठी पालिकेकडून जागा हस्तांतरित

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यालय मीरा रोडमधील प्लेझंट पार्क येथे उभारण्यात येणार आहे. या पोलीस आयुक्तालयाची जागा पोलिसांकडे हस्तांतरित झाली असून निधीसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाची स्थापना १ ऑक्टोबर २०२१ रोजी झाली. परंतु अद्याप स्वतःचे पोलीस आयुक्तालय कार्यालय नव्हते. त्यामुळे पोलीस आयुक्तालय भाड्याच्या इमारतीत सुरू करण्यात आले आहे. आयुक्तालयाच्या जागेसाठी शोध सुरू होता. पोलीस आयुक्तालय कार्यालयासाठी मीरा रोड येथील प्लेझंट पार्क येथे (आरक्षण क्रमांक ३३४) ११ हजार ८८५ चौरस मीटर जमीन आरक्षित करण्यात आली आहे. या क्षेत्रापैकी सात हजार ३४६ चौरस मीटर क्षेत्र महापालिकेच्या नावे हस्तांतरित करण्यात आली आहे. त्याची बाजारभावानुसार असलेली २० कोटी रुपयांची किंमत मीरा-भाईंदर महापालिकेला अदा करण्यात आली आहे. या जागेचे हस्तांतर महापालिकेकडून पोलीस विभागाकडे करण्यात आले असून जागेचा सात-बारा उतारा पोलिसांच्या नावाने करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्तालयाची इमारत बांधण्याचे काम मेसर्स संजय राजदान यांची वास्तूविशारद म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. इमारतीचा आराखडा आणि खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. २०२२-२३ च्या निधीमधून पोलीस विभागाला करावयाच्या कामांमधून पोलीस आयुक्तालयाच्या कामाला प्राधान्य द्यावे, असे राज्याचे पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांनी पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांना सांगितले.

या कामासाठी चालू आर्थिक वर्षात निधी मिळावा, अशी मागणी शासनाकडे करण्यात आली आहे. त्यामुळे चालू आर्थिक वर्षातच पोलीस आयुक्तालयाचे काम सुरू केले जाण्याची शक्यता आहे.

लोकमत पृ. पान क्र. 2

# काँग्रेसचे अभियान सुरू

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर काँग्रेसच्या वतीने शहरात हाथ से हाथ जोडो अभियान सुरू केले आहे. शहरात २४ चौकसभा आणि पदयात्रांच्या माध्यमातून नागरिकांशी संवाद साधत सरकारचे अपयश मांडले जात असल्याचे जिल्हाध्यक्ष प्रमोद सामंत यांनी सांगितले. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ नेते बाळासाहेब थोरात यांच्या आदेशानुसार तथा माजी आमदार मुझफ्फर हुसेन यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक ब्लॉकमध्ये पदयात्रा काढण्यात येत आहेत.

लोकसत्ता पृ. पान क्र. 1

# शहरात खुले मद्यालय

## दुकानांच्या बाहेरच मद्यपींचा अड्डा, नागरिकांना त्रास

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई:** वसई, विरार शहरात सध्या खुल्या मद्यालयाचे प्रकार सुरू झाले आहेत. भरवस्तीत असणाऱ्या मद्य विक्री करणाऱ्या दुकानांच्या बाहेरच मद्यपी मद्यप्राशन करत असतात. पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग याकडे दुर्लक्ष करत असल्याने मद्यपींचा त्रास वाढला आहे.

मद्य विक्री करणाऱ्या दुकानांना (वाइन शॉप) एफएल २ हा परवाना दिला जातो. तर बार अॅण्ड रेस्टॉरंटमध्ये मद्य विक्रीसाठी एफएल ३ हा परवाना दिला जातो. हॉटेलमधील ज्या ठिकाणी मद्य विक्री करण्यात येते त्या जागेला परमिट रूम म्हणतात. त्याच्या बाहेर मद्य विक्री करता येत नाही. बेकायदा मद्य विक्री करणे गुन्हा आहे. याशिवाय सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन करता येत नाही. मात्र हे नियम डावलून शहरात अनेक ठिकाणी दुकानाबाहेरच मद्य विक्री करण्यात येते.

विरारमधील अर्नाळा सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या बीअर बारमधून ग्राहकांना मद्य दिले जाते आणि मग या परिसरातच ग्राहक मद्यपान करतात. त्याचा त्रास स्थानिक रहिवाशांना होत आहे. असाच प्रकार वसईतील वसंत नगरी येथे सुरू आहे. वसई पूर्वेला वसंत नगरी हा गजबजलेला निवासी वसाहतींचा परिसर आहे. या ठिकाणी शाळा, क्लासेस, बाजारपेठ (मार्केट) आहे. त्यामुळे लहान मुले, विद्यार्थी आणि महिलांची गर्दी असते. या वसंत नगरीमध्ये असलेल्या दिवाण मार्केटमध्येच एक खुले मद्यालय सुरू आहे. या ठिकाणी विनीत नावाचा एक देशी मद्याचा बार आहे. त्याला लागूनच एक नाव नसलेले बीअर शॉप आहे. या दोन्ही बारमधून मद्यपींना मद्य विक्री केली जाते. परंतु मद्यपी याच बारच्या आवारात, मार्केटमध्ये बसून मद्यपान करत असतात. यामुळे हा परिसर मद्यपींचा अड्डा बनू लागला आहे.

दरम्यान, अधिकृत मद्यविक्रेत्याने मद्य विकले आणि त्याच्या समोरील सार्वजनिक जागेत कुणी मद्यप्राशन केले तर मद्यविक्रेत्यावर नाही तर मद्यप्राशन करणाऱ्यावर कारवाई केली जाते, असे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

### नियम काय?

कुठल्याही सार्वजनिक ठिकाणी मद्य पिण्यास बंदी आहे. अशा व्यक्तींवर महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ चे कलम ८४ अन्वये ५ हजार रुपयांचा दंड होतो. जर कुणी बेकायदा मद्य विक्री करत असेल तर त्याच्यावर कलम ७, मनाई कलम २२, अधिनियम १९४९ च्या कलम ६८(अ) (ब) ८४, ९८, १०३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येतो. या कलमानुसार कमीत कमी २५ हजार रुपये व जास्तीत जास्त ५० हजार रुपये दंड आणि कमीत कमी ३ वर्षे व जास्तीत जास्त ५ वर्षांची शिक्षा किंवा दोन्हीही होऊ शकते. राज्य उत्पादन शुल्क विभागाबरोबरच पोलिसांनादेखील मुंबई पोलीस अॅक्ट ११० नुसार कारवाई करण्याचे अधिकार आहेत.

CamScanner
Scanned with CamScanner

दि.22/03/2023

लोकसत्ता पान क्र.12

केंद्रीय गृह विभागाचा अहवाल; मुंबई, पुण्यात सर्वाधिक गुन्हे दाखल

# महिलांवरील अत्याचारांत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर

अनिल कांबळे, लोकसत्ता



**नागपूर :** महिलांवरील लैंगिक अत्याचार आणि अन्य प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये दिवसेंदिवस लक्षणीय वाढ होत असून महिलांच्या विरोधात घडणाऱ्या गुन्ह्यांत महाराष्ट्र राज्य देशात तिसऱ्या क्रमांकावर आहे. पहिल्या क्रमांकावर उत्तर प्रदेश असल्याची नोंद केंद्रीय गृह विभागाच्या अहवालातून समोर आली आहे. महिलांबाबतचे सर्वाधिक गुन्हे मुंबई आणि पुणे शहरात दाखल झाल्याची माहिती पोलिसांच्या संकेतस्थळावरून समोर आली आहे.

अहवालातील आकडेवारीनुसार, २०२१-२२ मध्ये देशातील महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये देशात महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. २०२१ मध्ये एकूण ४ लाख २८ हजार गुन्हे नोंदवले गेले. त्यापैकी उत्तर प्रदेशात सर्वाधिक ५ लाख ६० हजार, त्यानंतर राजस्थान ४ लाख ७३८ आणि महाराष्ट्रात ३ लाख ९५ हजार गुन्ह्यांची नोंद झाली. सरासरी पाहता महाराष्ट्रात दररोज ११२ महिलांवर अत्याचार झाल्याच्या घटनांची नोंद झाल्याची माहिती समोर आली आहे. देशातील महानगरांच्या गुन्हेगारी अहवालावर नजर टाकल्यास देशाची राजधानी दिल्ली शहरात सर्वाधिक ३ हजार ९४८ महिलांबाबतच्या गुन्ह्यांची नोंद झाली असून दिल्ली पहिल्या क्रमांकावर आहे. त्यानंतर मुंबईत ११०० आणि बेंगळुरूमध्ये ५७८ गुन्ह्यांची नोंद झाल्याचे अहवालातून समोर आले आहे.

२०२३ जानेवारी ते फेब्रुवारी या दोन महिन्यांतही जवळपास १२ टक्क्यांनी गुन्ह्यांत वाढ झाल्याची नोंद पोलीस विभागाकडे आहे.

> “महिलांवरील अत्याचारांमध्ये वाढ होणे ही चिंतनीय बाब आहे. महिलांविरोधात घडणाऱ्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी महिला आयोगाच्यावतीने प्रयत्न करण्यात येत आहेत.
>
> - आभा पांडे, सदस्य, राज्य महिला आयोग.

लोकसत्ता पान क्र.12

# जुन्या निवृत्तिवेतनासाठी संप करू नका!

## केंद्राचा कर्मचाऱ्यांना कारवाईचा इशारा

पीटीआय, नवी दिल्ली

**केंद्र सरकारने** आपल्या सर्व कर्मचाऱ्यांना कोणत्याही आंदोलनात किंवा संपात सहभागी न होण्याचा इशारा दिला आहे. अन्यथा त्यांना ‘परिणाम’ भोगावे लागतील. ‘जॉइंट फोरम फॉर रिस्टोरेशन ऑफ ओल्ड पेन्शन स्कीम’ या शीर्षकाखाली मंगळवारी देशभरात जिल्हास्तरीय मेळावे काढण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्या पार्श्वभूमीवर सरकारच्या राष्ट्रीय संयुक्त कृती परिषदेने (नॅशनल जॉइंट काऊन्सिल ऑफ ॲक्शन) हा इशारा दिला आहे.

सरकारच्या कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाने (डीओपीटी) या संदर्भातील मार्गदर्शक तत्त्वे सोमवारी केंद्र सरकारच्या सर्व विभागांच्या सचिवांना जारी केली. त्यानुसार सरकारी कर्मचाऱ्यांना सामूहिक रजेवर जाणे, काम थांबवणे इत्यादींसह कोणत्याही प्रकारच्या संपात भाग घेण्यास किंवा आचरण नियम (सीसीएस), १९६४ च्या कलम ७ चे उल्लंघन करणारी कोणतीही कृती करण्यास प्रतिबंधित करण्यात आले आहे.

आदेशात नमूद केले आहे, की कर्मचाऱ्यांना संपावर जाण्याचे अधिकार देणारी कोणतीही वैधानिक तरतूद नाही. सर्वोच्च न्यायालयानेही अनेक निकालांमध्ये मान्य केले आहे, की संपावर जाणे हे आचारव्यवहारांच्या नियमांनुसार एक गंभीर स्वरूपाचे गैरवर्तन आहे.

## वेतनकपात, शिस्तभंगाचा बडगा

या आदेशानुसार, निषेधार्थ निदर्शनांसह कोणत्याही प्रकारच्या संपावर जाणाऱ्या कोणत्याही कर्मचाऱ्याला परिणामांना सामोरे जावे लागेल. यात वेतनकपात आणि शिस्तभंग कारवाईचा समावेश असू असू शकतो. जर कर्मचारी धरणे-निषेध-संपावर गेले तर, त्यात सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या वगैरे तपशीलाचा अहवाल संध्याकाळी ‘डीओपीटी’ला सुपूर्द केला जाऊ शकतो.

लोकमत पान क्र.1

# ‘गुगल पे’वर १० कोटी पाठवा, गडकरींना धमकी

## बेळगाव तुरुंगात पुन्हा पोहोचला मोबाइल


लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** ‘गुगल पे’वर १० कोटी पाठवा आणि पोलिसांना सांगू नका, अशा आशयाचा फोन बेळगावच्या तुरुंगातील कुख्यात आरोपीने दुसऱ्यांदा केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या जनसंपर्क कार्यालयात मंगळवारी सकाळी केला.

जयेश पुजारी ऊर्फ जयेश कांथा असे फोन करणाऱ्या आरोपीचे नाव आहे. त्याने यापूर्वी १४ जानेवारी २०२३ रोजी गडकरींच्या कार्यालयात तीन फोन केले होते. त्यावेळी त्याने डी गँगचा सदस्य असल्याचे सांगत १०० कोटींची मागणी केली होती. हा फोन बेळगावच्या तुरुंगातून आल्याचे निष्पन्न झाले होते. मंगळवारी सकाळी १०.५३ आणि ११.०८ वाजता पुन्हा धमकीचे फोन आले. त्यावरून जयेशने रझिया नावाच्या तरुणीचा मोबाइल क्रमांक देऊन त्यावर गुगल पे द्वारे १० कोटी रुपये मागितले. दाऊद गँगचा सदस्य असल्याचा पुनरुच्चार त्याने केला. लोकेशन तपासले असता बेळगावच्या तुरुंगाचे निघाले. केंद्रीय एजन्सी आणि शहर पोलिसांनी गडकरींच्या सुरक्षेचे निरीक्षण करून गरजेनुसार सुरक्षा वाढविली.

### कोण आहे रझिया ?

- रझिया ही युवती सामान्य कुटुंबातील आहे. ती इव्हेंट मॅनेजमेंटचे काम करते. तिचा बॉयफ्रेंड बेळगावच्या तुरुंगात शिक्षा भोगत आहे. तिची आणि जयेशची ओळख झाली.
- रझियाच्या बॉयफ्रेंडने जयेशच्या मोबाइलवरून तिच्याशी संपर्क साधला. याप्रकारे रझियाचा मोबाइल क्रमांक जयेशकडे आला.



धमकीचे फोन आल्यानंतर नितीन गडकरी यांच्या नागपुरातील खामला भागात असलेल्या जनसंपर्क कार्यालयाबाहेर तैनात बंदोबस्त.

CamScanner
Scanned with CamScanner

दि. 22/03/2023

म.टा.पृ.पान क्र.1

# दफनभूमीविरोधात पेणकरपाडा आक्रमक

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

मिरा रोडच्या पेणकरपाडा येथे दफनभूमीसाठी जागा आरक्षित ठेवली असून, याला स्थानिक रहिवाशांचा मागील अनेक वर्षांपासून विरोध आहे. आता, ही जमीन विकसित करण्यासाठी पालिकेने हालचाली सुरू केल्याने ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. येथील दफनभूमीचे आरक्षण रद्द करावे, अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

या संदर्भात मंगळवारी ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने पालिका आयुक्त दिलीप ढोले यांची तसेच पोलिस अधिकाऱ्यांची भेट घेतली. या शिष्टमंडळात सर्व पक्षांच्या पदाधिकाऱ्यांचा समावेश होता. यावेळी पालिका आयुक्तांनी कायदेशीर कारवाई केली जाईल अशी माहिती ग्रामस्थांना दिल्याचे त्यांनी सांगितले.

**आरक्षण रद्द करण्याची मागणी**

मिरा-भाईंदर शहराच्या १९९७मध्ये प्रसिद्ध झालेल्या शेवटच्या विकास आराखड्यात पेणकर पाड्यालगत दफनभूमीसाठी जागा आरक्षित आहे. या आरक्षणाला स्थानिकांचा विरोध असून या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी महापालिका प्रशासनाकडे पत्रव्यवहारही केला आहे. हे आरक्षण रद्द करावे, तसेच प्रशासकीय ठरावाप्रमाणे उत्तन व काशी येथील सरकारी जागेत सर्वधर्मीयांसाठी स्मशानभूमी खुली करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी पालिका प्रशासनाला दिला आहे.

पुढारी पृ. पान क्र.3

# बांधकाम तोडण्याच्या धमकीने कराची वसुली?

भाईंदर : पुढारी वृत्तसेवा

मिरा-भाईंदर महापालिकेच्या प्रभाग समिती १ कार्यालयातील मालमत्ता कर वसुली पथक सोमवारी सायंकाळच्या सुमारास भाईंदर पश्चिमेकडील गणेश देवल नगर झोपडपट्टीमध्ये थकीत कर वसुलीसाठी गेले होते. या पथकाने थकबाकीदार झोपडीधारकांना थकीत कर न भरल्यास त्यांची बांधकामे अथवा झोपडी तोडण्याची धमकी दिल्याचा आरोप माजी नगरसेवक दरोगा पांड्ये यांनी केला आहे. मात्र पथकाने कोणतेही बांधकाम तोडले नसून केवळ थकीत कर वसुलीसाठीच तेथे गेल्याचा दावा केला आहे.

भाईंदर पश्चिमेकडील प्रभाग समिती १ अंतर्गत असलेल्या गणेश देवल नगर झोपडपट्टीमध्ये कर वसुली पथक सोमवारी सायंकाळच्या सुमारास गेले होते. त्यांनी आपल्यासोबत जेसीबी नेत थकीत कर न भरणाऱ्यांचे बांधकाम अथवा झोपडीवर कारवाई करण्याची धमकी दिल्याचा आरोप पांड्ये यांनी केला आहे. पथकाने कारवाईची धमकी देताच लोकांमध्ये भिती निर्माण झाल्याचा दावा पांड्ये यांनी केला. याबाबत वसुली पथकातील कर निरीक्षक राजेश चव्हाण म्हणाले, आम्ही कोणत्याही बांधकामावर तसेच झोपडीवर कारवाई केलेली नाही तसेच तशी धमकी देखील दिलेली नाही.

सामना पान क्र. 8

# फाशी ही क्रूर शिक्षा

## पर्याय शोधण्याचे सुप्रीम कोर्टाचे केंद्राला निर्देश

नवी दिल्ली, दि. २१ (वृत्तसंस्था) – कैद्याला फासावर लटकवण्याऐवजी मृत्युदंड म्हणून दुसरी शिक्षा देता येऊ शकते का, याचा विचार केंद्र सरकारने करावा आणि तज्ज्ञांची समिती नेमून कमी वेदनेचा दुसरा पर्याय सुचवावा, अशी महत्त्वपूर्ण सूचना सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी केली. फासावर लटकवल्यानंतर त्या कैद्याचा मृत्यू व्हायला किती वेळ लागतो? फाशीमुळे किती वेदना होतात? याबाबत मोठ्या रुग्णालयांतील तज्ज्ञांकडून शास्त्रीय डाटा मिळवून तो न्यायालयापुढे सादर करा, असे निर्देशही सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी यावेळी दिले.

देशातील सध्याची फाशी देण्याची पद्धत अत्यंत क्रूर आहे, असा दावा करणाऱ्या याचिकेवर मंगळवारी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठापुढे सुनावणी झाली. कैद्याला फासावर लटकवल्यामुळे प्रचंड वेदना होऊन त्याचा मृत्यू होतो. त्याऐवजी गोळीबार, प्राणघातक इंजेक्शन किंवा विजेचा शॉक देऊन मृत्युदंडाची शिक्षा देण्यात यावी, अशी सूचना याचिकेत केली आहे. त्याची गंभीर दखल घेत न्यायालयाने केंद्र सरकारला फाशीच्या शिक्षेला दुसरा कमी वेदनेचा पर्याय सुचविण्याचे निर्देश दिले. यासंदर्भात तज्ज्ञांची समिती स्थापन करून फाशीऐवजी कमी वेदनेच्या दुसऱ्या पर्यायाचा विचार करा, अशी सूचना न्यायालयाने अॅटर्नी जनरल आर. वेंकटरामन यांना केली. याप्रकरणी २ मे रोजी पुढील सुनावणी होणार आहे.

पुढारी पृ. पान क्र.3

# गहाळ झालेला ऐवज २ तासात परत

मिरारोड : नायगाव पोलीस ठाणे हद्दीत राहत असलेले मोहन भगवान चाळके व त्यांची पत्नी मनिषा मोहन चाळके हे नायगाव येथे त्यांच्या घरी मोटारसायकलने जात असताना मनिषा मोहन चाळके यांनी त्यांची पर्स व त्यातील ५ तोळे ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व २ मोबाईल असा मुद्देमाल गहाळ झाल्याबाबत नायगाव पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. पोलीस पथकाने सिसिटीव्ही फुटेज तपासनी करून प्रवास करताना पडलेले दागिने एकाला मिळाले होते. त्याचा तपास करून त्याच्याकडून ते दागिने असा एकुण २,७५,००० रुपये व ३० हजार रुपयांचे २ मोबाईल असा गहाळ झालेला मुद्देमाल मनीषा मोहन चाळके यांना २ तासात परत मिळवून देण्यात आला आहे.

CamScanner

Scanned with CamScanner

दि.22/03/2023

पुण्यनगरी पृ. पान क्र.1

# महाराष्ट्र सुरक्षा बल जवानाकडून दोन लाखांचा दागिना परत

**मीरा रोड :** मीरा रोड येथे बागेश्वर धाम सरकार धीरेंद्र कृष्ण शास्त्रीजी यांच्या दोन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात महाराष्ट्र सुरक्षा बल जवान शिवाजी केदार यांना २ लाखांचा सोन्याचा दागिना मिळाला होता. केदार यांनी प्रामाणिकपणा दाखवत तो दागिना पोलिसांना परत केला. त्यामुळे मीरा-भाईंदर महापालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी प्रामाणिक व कर्तव्यदक्ष महाराष्ट्र सुरक्षा बल जवान शिवाजी केदार यांचा सत्कार केला.

## पालिका आयुक्तांकडून सत्कार



मीरा रोड एस. के. स्टोन येथील मैदानात बागेश्वर धाम सरकार धीरेंद्र कृष्ण शास्त्रीजी यांच्या दर्शनासाठी दोन दिवस भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. या कार्यक्रमात १८ मार्च रोजी महाराष्ट्र सुरक्षा बल जवान शिवाजी केदार सुरक्षिततेसाठी तैनात असताना त्यांना सायंकाळच्या सुमारास गर्दीच्या ठिकाणी अंदाजे २ लाख रुपये किमतीची सोनसाखळी मिळाली होती. महाराष्ट्र सुरक्षा बल जवान यांनी प्रामाणिकपणे व कर्तव्यदक्ष राहून तातडीने ती सोनसाखळी मीरा रोड येथील पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक यांच्या ताब्यात दिली. अंदाजे २ लाख रुपयांची मिळालेली सोनसाखळी महाराष्ट्र सुरक्षा बल जवान केदार यांनी आपला प्रामाणिकपणा दाखवत पोलिसांच्या ताब्यात दिल्यामुळे महापालिका आयुक्त तथा प्रशासक दिलीप ढोले यांनी महाराष्ट्र सुरक्षा बल जवानाचा सत्कार केला.

सकाळ पृ. पान क्र.1

# मिरा रोडमध्ये आजपासून रंगणार चैत्र नवरात्रोत्सव

भाईंदर, ता. २१ (बातमीदार) : मिरा रोड येथील बेवर्ली पार्क परिसरातील नामदार गोखले मैदानात आमदार प्रताप सरनाईक फाऊंडेशनच्या वतीने चैत्र नवरात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. देवीची भक्ती, उपासना करण्याबरोबरच २२ ते ३१ मार्चदरम्यान विविध सांस्कृतिक-धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन याकाळात करण्यात आले आहे. जेजुरी गडाचा देखावा हे या उत्सवाचे आकर्षण असणार आहे.

सर्व भक्तांसाठी मराठी, राजस्थानी, गुजराती, उत्तर भारतीय, दक्षिण भारतीय, बंगाली समाजाचे कलाकार कलेच्या माध्यमातून नवरात्रोत्सवात सांस्कृतिक आविष्कार सादर करणार आहेत. या वर्षी जेजुरी गडाचा देखावा साकारण्यात आला असून त्यात देवीच्या मूर्तीची स्थापना होणार आहे. या उत्सवासाठी शाडू मातीची ७ फूट उंचीची मूर्ती ठाण्यावरून आणण्यात आली आहे. बुधवारी सकाळी १० वाजता आमदार प्रताप सरनाईक यांच्या मंगल नगर येथील जनसंपर्क कार्यालयापासून देवीची भव्य मिरवणूक तसेच नववर्ष स्वागतयात्रा काढण्यात येणार आहे.

# वसई-विरार, मिरा-भाईंदरमध्ये २० शोभायात्रा

विरार, ता. २१ (बातमीदार) : गुढीपाडवानिमित्त मिरा-भाईंदर, वसई विरार पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये पाच मिरवणुका, ११ शोभायात्रा, चार स्वागतयात्रा अशा एकूण २० मिरवणुकीचे नियोजन करण्यात आले आहे. भाईंदर पूर्वेला नवघर पोलिस ठाण्याच्या हद्दीत २ ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. विरारमध्ये एका ठिकाणी पूजेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती पोलिस आयुक्तलयाकडून देण्यात आली आहे.

CamScanner
Scanned with CamScanner

दि. 22/03/2023

लोकसत्ता पू. पान क्र. 1

# समुद्र किनारे पर्यटकांसाठी धोकादायक

## जीवरक्षकांची कमतरता ; आठ दिवसांत तीन पर्यटकांचा बुडून मृत्यू

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई:** बेसुमार वाळू उपसा, समुद्र किनाऱ्याची होणारी धूप यामुळे वसईतील समुद्र किनारे धोकादायक बनू लागले आहेत. मागील आठ दिवसांत तीन पर्यटक बुडण्याच्या घटना घडल्या आहेत.

वसई पश्चिमेला विस्तीर्ण असे समुद्र किनारे आहेत. अर्नाळा, नवापूर, भुईगाव, राजोडी, सुरुची, कळंब, रानगाव आदी समुद्र किनारे पर्यटनासाठी प्रसिद्ध आहेत. या भागात विविध ठिकाणच्या भागांतून पर्यटक फिरण्यासाठी येतात.

मात्र मागील काही वर्षांपासून किनाऱ्यालगतच छुप्या मार्गाने वाळू उपसा होऊ लागला आहे. यामुळे समुद्रालगतच्या किनाऱ्यांची धूप होऊ लागली आहे. किनाऱ्यालगतचा परिसर खचून त्या ठिकाणी खोली निर्माण होत आहे. याचा अंदाज पर्यटकांना येत नाही. यामुळे पर्यटक बुडण्याच्या घटना समोर येऊ लागल्या आहेत. नुकताच वसईच्या कळंब समुद्र किनारी एका २१ वर्षीय तरुणाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. याआधीसुद्धा समुद्रकिनारी अनेक पर्यटक बुडून मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. तरीही प्रशासनाकडून पर्यटकांच्या सुरक्षेसाठी कोणत्याही उपाययोजना केल्या जात नसल्याचा आरोप नागरिकांमधून करण्यात येत आहे.

सातत्याने पर्यटक बुडण्याच्या घटना घडतात यासाठी सूचना फलक, ध्वनिवर्धकाद्वारे जनजागृती अशा उपाययोजना आखणे गरजेचे आहे तसे होत नसल्याने पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण (पान ६ वर)




## वसईचे समुद्र किनारे पर्यटकांसाठी धोकादायक

(पान १ वरून) झाला आहे.

समुद्र किनाऱ्यावर पर्यटकांच्या सुरक्षेसाठी जीवरक्षक नेमले आहेत. मात्र पर्यटकांची वाढती संख्या यामुळे हे जीवरक्षकही अपुरे पडू लागले आहेत. विशेषत: सुट्टीच्या दिवशी किनारे पर्यटकांनी अधिक गजबजलेले असतात. अशा वेळेस एका समुद्र किनाऱ्यावर किमान ५ ते ६ जीवरक्षक तैनात असणे गरजेचे आहे. जीवरक्षक नसल्याने पर्यटकांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यास अडचणी येतात. पर्यटक बुडण्याच्या घटना रोखण्यासाठी किनाऱ्यावर जीवरक्षकांची संख्या वाढविण्यात यावी यासाठी महापालिकेला पत्र दिले असल्याचे वसई पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजित आंधळे यांनी सांगितले आहे.

लोकसत्ता पू. पान क्र. 4

# गुंतवणुकीच्या आमिषातून सहा लाखांची फसवणूक

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

गुन्हे वृत्त

**वसई :** ऑनलाइन ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक केल्यास काही तासांत लाखो रुपये मिळतील, असे सांगून एका तरुणीला सायबर भामट्यांनी सहा लाख रुपयांचा गंडा घातला आहे.

नालासोपारा पूर्वेच्या मोरेगाव येथे राहणाऱ्या तरुणीला इन्स्टाग्रामवर एक संदेश आला होता. त्यात ५० हजार रुपये गुंतवल्यास तीन ते चार तासांत चार लाख रुपये परतावा मिळेल, असे म्हटले होते. घरबसल्या काही तासांत लाखो रुपये मिळणार असल्याने तिने त्यावर विश्वास ठेवला. तिने त्या संदेशात दिलेल्या लिंक आणि व्हॉट्सअॅप नंबरवर ट्रेडिंग, ब्रोकर खाते उघडले आणि पैसे भरले. त्यानंतर विविध नोंदणी आणि फी म्हणून या तरुणीकडून सहा लाख ८३ हजार रुपये उकळण्यात आले. तिने हे पैसे पेटीएमद्वारे भरले होते. मात्र तिला एक रुपयाही परतावा न देता तिची फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी तिने तक्रार दिल्यानंतर तुळींज पोलिसांनी कलम ४२० तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमाच्या कलम ६६ (सी) आणि(डी) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner
Scanned with CamScanner

# शिकायत करने वाले ही पुलिस को गलत समझते हैं कि पुलिस उनका कॉल नहीं उठाती

MHT संवाददाता
राकेश सिंह/नालासोपारा

ऑनलाइन ठगी के मामले काफी बढ़ गए हैं। हालांकि, मौजूदा स्थिति यह है कि पुलिस द्वारा पूछताछ के लिए बुलाए जाने पर कई लोग सामने नहीं आते हैं। ठगी करने वाले फरियादी ही सामने नहीं आ रहे हैं इसलिए आरोपितों की तलाश की जा रही है। ऑनलाइन ठगी के मामले में शिकायत करने के लिए संबंधित को ऑनलाइन सुविधा उपलब्ध कराई गई है। इस शिकायत को दर्ज करने के बाद संबंधित थाने में कक्षाएं लगीं। उसके बाद शिकायत के अनुसार अधिक जानकारी व अन्य सबूतों के लिए थाने से फरियादी को बुलाया जाता है। लेकिन कई मामलों में ऐसा लगता है कि फरियादी यह सोचकर पुलिस का फोन नहीं उठाता कि वह कोई झंझट नहीं चाहता। इसलिए शिकायत करने के लिए सिर्फ नाम ही रह गया है। नतीजतन, धोखाधड़ी के बाद भी मामले की जांच में मुश्किलें पैदा होती हैं।






**696 साइबर सेल को आवेदन :** साइबर सेल को ठगी को लेकर 696 आवेदन मिले हैं। इस आवेदन पर पुलिस स्टेशन ने जांच कर कार्रवाई की है। 4। मामले दर्ज : स्थानीय थाने में साइबर सेल से आवेदन मिलने के बाद जांच व पूछताछ के बाद उसके खिलाफ 4। मामले दर्ज किये गये हैं। सिर्फ 89 आवेदनों की प्रक्रिया पूरी साइबर विभाग में दाखिल आवेदनों में से सिर्फ 89 आवेदनों पर ही कार्रवाई हो सकी है। बाकी अन्य मामलों में शिकायतकर्ताओं ने सहयोग नहीं किया।

**330 आवेदनों का निस्तारण :** 330 आवेदनों का निस्तारण किया जा चुका है। आगे बाकी आवेदन में शिकायतकर्ता से संपर्क करके कार्रवाई की जाएगी।

**ये काम बताकर जाल में फंस जाते... :** बिजली बिल का भुगतान न करने का नाटक करना, एनीडेस्क या अन्य रिमोट एक्सेस ऐप के माध्यम से चीजें खरीदने का लालच देना, ओएलएक्स के माध्यम से लालच देना, ऑनलाइन नौकरी देने का लालच देना, ऑनलाइन गेम या अन्य कार्यों की पेशकश करके धोखा देना, क्रिप्टोकरंसी, ऑनलाइन ऋण में निवेश करने के लिए कहना, उपहार के रूप में भेजना शादी का झांसा देकर अटक जाते हैं

इनाम, पैसे के लालच से बचें: साइबर अपराधी नागरिकों को ऑनलाइन ठगने के लिए तरह-तरह के भेस का इस्तेमाल करते हैं, इनके जाल में फंसने से बचने के लिए सतर्क रहें, इनाम, पैसे के लालच से बचें। ऑनलाइन फ्रॉड या डेटा चोरी, छेड़छाड़ की स्थिति में उन्हें तुरंत साइबर पुलिस स्टेशन से संपर्क करना चाहिए।
- साइबर डिवीजन

Scanned with CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-276 मुंबई, बुधवार 22 मार्च 2023 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# प्रबंधक को गोली मारकर लाखों रुपये लूटने वाला मुख्य आरोपी नालासोपारा से गिरफ्तार

**वसई :** मध्य प्रदेश के सतना में ढवळ्या शराब दुकान के प्रबंधक की छह मार्च को गोली मारकर 22 लाख रुपये लूटने के अपराध के मुख्य आरोपी को पेल्हार थाने की अपराध जांच शाखा की टीम ने सोमवार शाम नालासोपारा से गिरफ्तार कर उसे एमपी पुलिस के हवाले कर दिया।



पुलिस सूत्रों से मिली जानकारी के अनुसार मध्य प्रदेश के सतना में 6 मार्च को 7 आरोपियों ने स्थानीय बैंक के बाहर शराब दुकान के प्रबंधक की दिनदहाड़े गोली मारकर हत्या कर दी.साथ ही मौके से 22 लाख रुपये लूट लिए। वहां की पुलिस ने 5 आरोपियों को गिरफ्तार किया था और एक के साथ मुठभेड़ हुई थी और इस अपराध का मुख्य आरोपी फरार हो गया था,मध्य प्रदेश पुलिस को सूचना मिली थी कि मुख्य आरोपी पालघर जिले के नालासोपारा में अपने मामा के घर छिपा हुआ है.इसलिए पुलिस पिछले तीन दिनों से नालासोपारा शहर में आई और आरोपियों के ठिकाने की तलाश शुरू कर दी लेकिन उन्हें निराशा हाथ लगी ।आखिरकार सोमवार दोपहर वे मदद के लिए पेल्हार की अपराध जांच शाखा की पुलिस के पास गए। पेल्हार पुलिस ने जाल बिछाया और दो से तीन घंटे के भीतर आरोपी को रिचर्ड कंपाउंड से हिरासत में ले लिया ।गिरफ्तार आरोपी की पहचान नीलेश जनार्दन यादव (30) के रूप में हुई है। फिलहाल आरोपी को मध्य प्रदेश पुलिस की हिरासत में सौंप दिया गया है।

Scanned with CamScanner

दैनिक
R.N.I. NO MAHHIN/2008/25162
# मुंबई केसरी टाइम्स
एक साथ प्रकाशित, पालघर, ठाणे, मुंबई.
www.mumbaikesaritimes.com
वर्ष : १५ अंक : 283 बुधवार २२ मार्च २०२३ मूल्य 2 रुपए Post-Reg- No. PLG/249/2022/2025 पृष्ठ : 08

# क्राइम डिटेक्शन को मिली कामयाबी ; लाखों रुपये आभूषण को ढूंढकर शिकायतकर्ता को लौटाया

**वसई ;** नायगांव पुलिस थाने की क्राइम डिटेक्शन टीम ने शिकायतकर्ता को गुम हुए सोने के आभूषण और मोबाइल हैंडसेट २ घंटे के भीतर लौटाने का उत्कृष्ट कार्य किया है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने मंगलवार को दी है।पुलिस ने बताया कि मोहन भगवान चालके व पत्नी मनिषा मोहन चालके.निवासी-साईधाम कॉम्पेल्कस.नायगाव पूर्व में रहते है। अपने घर से बाइक से नायगांव रेलवे स्टेशन जाते समय मनिषा मोहन चालके पर्स व ५ तोले ३ ग्राम वजन सोने आभूषण व २ मोबाइल गिर गया.इस मामले में गुम मालमत्ता के तहत नायगांव थाने में केस दर्ज हुआ। पुलिस अधिकारी ने बताया कि चूंकि लापता संपत्ति की कीमत एक मुद्दा है, इसलिए मामले की गंभीरता को ध्यान में रखते हुए



नायगांव थाने के वरिष्ठ पुलिस निरीक्षक रमेश भामे द्वारा दिए गए मार्गदर्शन और सुझाव के अनुसार क्राइम डिटेक्शन के अधिकारी व कर्मचारी ने शिकायतकर्ता के घर से नायगांव स्टेशन तक सीसीटीवी फुटेज व तकनीकी विश्लेषण के माध्यम से प्राप्त जानकारी के तहत ३ तोले वजन आभूषण मंगलसूत्र.२ तोले वजन नेकलेस ०.५ ग्राम वजन अंगूठी कुलमिलाकर ०२,७५,००० रुपये व मोबाइल कीमत ३०,००० रुपये यानी कुलमिलाकर ०३,०,५००० रुपये की गुम हुआ सामग्री को नायगांव पुलिस ने मनीषा मोहन चालके को सही सलामत सुपुर्द कर दिया है। यह उत्कृष्ट कार्य परिमंडल ३ डीसीपी सुहास बावचे व एसीपी पद्मजा बढे के मार्गदर्शन में नायगांव थाने के पी.आई रमेश भामे व मिलींद साबले (क्राइम पी.आई ) ने की है।

Scanned with CamScanner

लोकमत

# पैसे मिळवून द्या साहेब म्हणणारे पोलिसांचा फोनही उचलेनात!

## माहिती देणेही अनेकांना वाटते कटकट : आरोपी फिरतात मोकाट

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : ऑनलाइन फसवणुकीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. मात्र प्रत्यक्षात पोलिसांनी विचारपूस करण्यासाठी बोलावल्यास अनेकजण पुढे येत नसल्याची सध्याची स्थिती आहे. फसवणूक झालेले तक्रारदारच पुढे येत नसल्याने आरोपींचे फावत चालले आहे. ऑनलाइन फसवणूक झाल्यास संबंधितास तक्रार करण्यासाठी ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून दिली आहे. ही तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पोलिस ठाण्याकडे वर्ग होते. त्यानंतर तक्रारीच्या अनुषंगाने अधिकची माहिती व इतर पुराव्यांसाठी पोलिस ठाण्यामधून तक्रारदाराला फोन करून विचारणा केली जाते. मात्र अनेक प्रकरणांमध्ये तक्रारदार झंझट नको असा विचार करून पोलिसांचाच फोन उचलत नाही, असे दिसते आहे. त्यामुळे केवळ नावालाच तक्रार शिल्लक राहते. परिणामी फसवणूक झाल्यानंतरही त्या प्रकरणात चौकशी करताना अडचणी निर्माण होतात.



### ६९६ अर्ज सायबर सेलकडे

सायबर सेलकडे फसवणूक झाल्याप्रकरणी ६९६ अर्ज आलेत. या अर्जांची पोलिस ठाण्यातून चौकशी होऊन त्यावर कारवाई केली जाते.




### ४१ गुन्हे झाले दाखल

स्थनिक पोलिस ठाण्यात सायबर सेलकडून अर्ज आल्यावर त्याच्यावर तपास व चौकशी करून आतापर्यंत ४१ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.



### ३३० अर्ज काढले निकाली

प्राप्त अर्जांपैकी ३३० अर्ज निकाली काढले आहेत. उर्वरित अर्जांमध्ये तक्रारदाराशी संपर्क करून पुढील कारवाई होणार आहे.

### खात्यावरून परस्पर लाटली रक्कम

बँक खात्यातून परस्पर रक्कम लाटल्याच्या तक्रारी ऑनलाइन स्वरूपात सायबर पोलिस ठाण्याकडे प्राप्त होतात. या तक्रारींची तपासणी केली असता, बहुतांश प्रकरणात तक्रारदारांची चूक असल्याचे समोर आले. त्यामुळे तक्रारदारदेखील गांभीर्याने घेत नाहीत.

### ८९ अर्जांचीच प्रक्रिया पूर्ण

सायबर विभागात दाखल असलेल्या अर्जांपैकी ८९ अर्जांचीच प्रक्रिया पूर्ण झाली. उर्वरित प्रकरणांमध्ये तक्रारदारांनी सहकार्य केले नाही.

### ही कामे सांगून जाळ्यात अडकवतात

इलेक्ट्रिसिटी बिल न भरल्याचे सांगून, एनिडेस्क किंवा इतर रिमोट ॲक्सेस ॲपद्वारे, ओएलएक्सद्वारे वस्तू घेण्याचे आमिष दाखवून, ऑनलाइन जॉब देण्याचे आमिष दाखवून, ऑनलाइन गेम वा इतर टास्क देऊन करण्यात येणारी फसवणूक, क्रिप्टो करन्सीमध्ये गुंतवणूक करण्यास सांगून, ऑनलाइन लोन, लग्नाचे आमिषाने गिफ्ट पाठवतो असे सांगून अडकवतात.

### बक्षीस, पैशाचा मोह टाळा

सायबर गुन्हेगार वेगवेगळ्या क्लृप्त्या वापरून नागरिकांची ऑनलाइन फसवणूक करतात. त्यांच्या जाळ्यात न अडकण्यासाठी सतर्क राहा. बक्षीस, पैशाचा मोह टाळणे आवश्यक आहे. ऑनलाइन फसवणूक किंवा डेटा चोरी, छेडछाड झाल्यास त्यांनी सायबर पोलिस ठाण्यात तत्काळ संपर्क साधावा. • सायबर विभाग



Scanned with CamScanner

लोकमत

# मध्य प्रदेशातून फरार खुनी आरोपीला अटक

## वाइन शॉप व्यवस्थापकावर झाडल्या गोळ्या

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : मध्य प्रदेशातील सतना येथे ६ मार्चला दिवसाढवळ्या वाइन शॉपच्या व्यवस्थापकावर गोळ्या घालून त्याची हत्या करत २२ लाख रुपये लुटल्याची घटना घडली होती. या गुन्ह्यातील मुख्य आरोपीला नालासोपाऱ्यातून पेल्हार पोलिस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने सोमवारी संध्याकाळी ताब्यात घेऊन मध्यप्रदेश पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मध्य प्रदेशातील सतना येथे ६ मार्चला ७ आरोपींनी स्थानिक बँकेच्या बाहेर दिवसाढवळ्या वाइन शॉपच्या व्यवस्थापकावर गोळ्या झाडून हत्या केली होती, तसेच घटनास्थळावरून २२ लाख रुपये लुटून नेले होते. पोलिसांनी पाच आरोपीला अटक केली होती, तर एकाचा एन्काउंटर केला होता. या गुन्ह्यातील मुख्य आरोपी फरार होता. यातील मुख्य आरोपी पालघर जिल्ह्यातील नालासोपारा येथे त्याच्या मामाच्या घरी लपल्याची माहिती मध्य प्रदेश पोलिसांना मिळाली होती. त्यामुळे त्या पोलिसांनी मागील तीन दिवसांपासून नालासोपारा शहरात येऊन आरोपीचा ठावठिकाणा शोधला; पण त्यांची निराशा झाली. शेवटी सोमवारी दुपारी ते पेल्हारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांकडे मदतीसाठी गेले. पेल्हार पोलिसांनी सापळा लावून दोन ते तीन तासांत या आरोपीला रिचर्ड कंपाउंडमधून ताब्यात घेतले. नीलेश जनार्दन यादव (वय ३०), असे अटक आरोपीचे नाव आहे.

Hello Vasai
Page No. 4 Mar 22, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# सण गुढीपाडव्याचा, शहरात उत्साह खरेदीचा



लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** कोरोनानंतर यंदा गुढीपाडवा आनंदात आणि उत्साहात साजरा होत आहे. या गुढीपाडव्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांची मंगळवारी सायंकाळी बाजारपेठांत गर्दी दिसली.

साखरगाठी, गुढीचे साहित्य यासह नवी उत्पादने खरेदी करण्यासाठी उशिरापर्यंत नालासोपारा शहरासह वसई तालुक्यातील दुकानांमध्ये नागरिकांची गर्दी होती. नव्या वर्षाची सुरुवात पंचांगाचे पूजन करून केली जाते. पंचांग तसेच महिलांनी फुले, गाठ्या, गुढीचे पूजा साहित्य खरेदी केले. आंब्याला मागणी होती. पाडव्याचा मुहूर्त साधून नवी वस्तू घरी आणण्यासाठी इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या दालनांमध्येही ग्राहकांची वर्दळ होती.

गुढीपाडव्याचा मान असलेल्या साखरेच्या गाठी विविध रंगांमध्ये व किमान १० रुपयांपासून ते १५० रुपयांपर्यंत त्या उपलब्ध होत्या. विविध रंगांच्या साखरगाठींसह ड्रायफ्रूटच्या आकर्षक गाठीही दुकानात दिसल्या. ड्रायफ्रूटचे गाठीहार १०० ते २०० रुपयांपर्यंत विकले जात आहेत. बचत गटांनी केलेल्या रेडिमेड गुढ्यांनाही पसंती मिळाली. टेबलावर, कारमध्ये ठेवता येण्यासारख्या छोट्या गुढीसह मोठ्या रेडिमेड गुढ्या पन्नास रुपयांपासून उपलब्ध होत्या.

Hello Vasai
Page No. 3 Mar 22, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner